

**॥ श्री गजानन महाराजांची आरती ॥**

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया, स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी ।
स्थिरचर व्यापून उरलें जें या जगतासी ॥
तें तूं तत्व खरोखर निःसंशय असमी ।
लीलामात्रें धरिलें मानवदेहासी ॥ जयदेव जयदेव ॥ १ ॥

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया, स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

होऊं न देशी त्याची जाणिव तूं कवणा ।
करूनी ‘गणि गण गणांत बोते’ या भजना, बोते या भजना ॥
धाता हरिहर गुरूवर तूंचि सुखसदना, तूंची सुखसदना ।
जिकडें पहावें तिकडें तूं दिससी नयना ॥ जयदेव जयदेव ॥ २ ॥

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया, स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

लीला अनंत केल्या बंकट सदनास।
पेटविले त्या अग्नीवांचूनि चिलमेस।
क्षणांत आणिलें जीवन निर्जल वापीस।
केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश ॥ जयदेव जयदेव ॥ ३ ॥

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया, स्वामी गणराया।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

व्याधी वारूनं केलें कैकां संपन्न।
करविलें भक्तालागी विठ्ठल-दर्शन, विठ्ठल-दर्शन।
भवसिंधू हा तरण्या नौका तव चरण, नौका तव चरण।
स्वामी दासगणूंचे मान्य करा कवन ॥ जयदेव जयदेव ॥ ४ ॥

जय जय सत् चित् स्वरूपा स्वामी गणराया, स्वामी गणराया।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ०॥

## ॥ कापूर आरती ॥

कर्पूरगौरं करूणावतारं। संसारसारं भुजगेंद्रहारम् ॥
सदावसंतं हृदयारविन्दे। भवंभवानी सहितं नमामि ॥
मंदारमाला कुलीताल कायै। कपाल मालांकित शेखराय ॥
दिव्यांबरायै च दिगंबराय। नमः शिवाय नमः शिवाय ॥

॥ ॐ कर्पूर निरांजन दीपं समर्पयामी ॥

## ।। मंत्र पुष्पांजलि ।।

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवः ।।
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।।
स मे कामान् कामकामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ।।
ॐ स्वस्ति । साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं ,
पारमेष्ठ्यं राज्यं, महाराज्य माधिपत्यमयं, समंतपर्यायीस्यात्
सार्वभौमः सार्वायुष आंतादा परार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति: ।
तदप्येष श्लोको ऽ भिगीतो मरूतः परिवेष्टारो मरूतस्या ऽ वसन् गृहे ।।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।
एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ति प्रचोदयात् ।।
ॐ गुरुदेवाय विद्महे, परम् ब्रह्माय धीमहि । तन्नो गुरुः प्रचोदयात् ।।

### ।। श्लोक ।। (वृत्त-शिखरिणी)

पिता माता बंधु तुजविण असे कोण मजला ।
बहू मी अन्यायी परि सकळहि लाज तुजला ।।
न जाणे मी कांही जप तप पुजा साधन रिती ।
कृपादृष्टी पाहे शरण तुज आलो गणपती ।।

### ।। श्लोक ।। (भुजंगप्रयात वृत्त)

सदासर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।।
उपेक्षूं नको गुणवंता अनंता ।
रघुनायका मागणे हेची आता ।। १ ।।

उपासनेला दृढ चालवावे ।
भूदेव-संतासि सदा नमावे ।।
सत्कर्मयोगे वय घालवावे ।
सर्वांमुखी मंगल बोलवावे ।। २ ।।

**अष्टक ॥** (श्री दासगणू कृत)

गजानना गुणागरा, परम मंगला पावना ।
अशींच अवघे हरी, दुरीत तेवि दुर्वासना ॥
नसें त्रिभुवनामधे, तुजविन आम्हां आसरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ १ ॥

निरालसपणें नसे, घडलि अल्प सेवा करी ।
तुझी पतितपावना, भटकलो वृथा भूवरी ॥
विसंबत न गाय ती, आपुलिया कधीं वांसरा ।
करी पदनातावरी, बहु दया न रोषा धरा ॥ २ ॥

अलास जगीं लावण्या, परतुनी सु-वाटे जन ।
समर्थ गुरूराज ज्या, भुषवि नाम नारायण ॥
म्हणून तुज प्रार्थना, सतत जोडुनिया करा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ३ ॥

क्षणांत जल आणिले, नसून थेंब त्या वापिला ।
क्षणांत गमनाप्रती, करिसि इच्छिलेल्या स्थळा ॥
क्षणांत स्वरूपे किती, विविध धरिसी धीवरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ४ ॥

अगाध करणी तुझी, गुरूवरा ! न लोकां कळे ।
तुला त्यजुनी व्यर्थ ते, आचरितात नाना खुळे ॥
कृपा उदक मागती, त्यजुनी गौतमीच्या तिरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ५ ॥

समर्थ स्वरूपाप्रती, धरून साच बाळापूरी ।
तुम्ही प्रगट जाहलां, सुशिल बाळकृष्णा घरी ॥
हरिस्वरूप घेऊनि, दिधली भेट भीमातिरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ६ ॥

सच्छिद्र नौकेप्रती, त्वदिय पाय हे लागतां ।
जलांत बुडतां तरी, तिजसी नर्मदा दे हाता ॥
अशा तुजसि वाणण्या, नच समर्थ माझी गिरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ७ ॥

अतां न बहु बोलतां, तव पदांबुजा वंदितो ।
पडो विसर ना कदा, मदिय हेंचि मी मागतों ॥
तुम्ही वरद आपुला, कर धरा गणूच्या शिरा ।
करी पदनतावरी, बहु दया न रोषा धरा ॥ ८ ॥

**॥ श्लोक ॥ (वृत्त -इंद्रवज्रा)**

ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे ।
त्या त्या स्थळी हे निजरूप तुझे ॥
मी ठेवितों मस्तक ज्या ठिकाणी ।
तेथे तुझें सत्-गुरू पाय दोन्ही ॥

**॥ प्रदक्षिणा ॥**

यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च ।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणं पदे पदे ॥

## ॥ क्षमापनम् ॥

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।
तस्मात्कारूण्यभावेन रक्षस्व परमेश्वर ॥
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर ।
यत्पुजितं मया देव परिपूर्ण तदस्तु मे ॥
आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम् ।
पूजा चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर ॥
॥ श्री समर्थ सत्-गुरू गजानन महाराज की जयऽऽऽ ॥

"अनंतकोटी... ब्रह्मांडनायक...
महाराजाधिराज... योगीराज...
परम् ब्रह्म ... सत् चित् आनंद ...
भक्तप्रतिपालक... शेगांवनिवासी...
समर्थ सत् गुरु ... श्री गजानन महाराज कि...
जयऽऽऽ... !!!"

@@@@@

